तात्काळ

क्रमांक : माध्य-१ (१३) पीडी-अ ११६
पुणे - ५ दिनांक - 1 JUL 1972

प्रति

मुख्याध्यापक,
अंजुमन हायस्कूल, जुन्नर
मु. जुन्नर, जिल्हा पुणे

विषय :- शैक्षणिक वर्ष १९७२-७३ मध्ये माध्यमिक शाळेत इ ५वी ते ७वी चे वर्ग जोडण्यास-उघडण्याबाबत---

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक O.R./42/1972-73
दिनांक १२.५.१९७२

महोदय,

आपल्या माध्यमिक शाळेत जून १९७२ पासून खालचे वर्ग उघडण्यासंबंधी आपण केलेल्या अर्जाचा व येणाऱ्या [illegible] विचार करण्यात आला असून आपल्या शाळेत इ. पाचवी पासून (उर्दू माध्यमातून) एक वर्ग तुकडी जून १९७२ पासून सुरु करण्यास शासनाचे आदेशानुसार खालील अटींवर अनुदानसहित तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

१) माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीनुसार योग्य जागा, फर्निचर, शैक्षणिक साहित्य व आवश्यक प्रशिक्षित असा शिक्षक वर्ग यांची सोय असावी.

२) सरासरी हजेरी ३० ची अट कोणत्याही सबबीवर शिथिल करण्यात येणार नाही.

३.) वरील प्रमाणे मंजूर केलेल्या इ.५ अगर ६ अगर ७वी च्या वर्गाच्या मंजूर केलेल्या तुकड्यांपेक्षा अधिक वर्ग चालू वर्षी पुढेच उघडण्यात येऊ नयेत विना परवानगी उघडलेल्या जादा वर्गावर/तुकड्यावर अनुदान मिळणार नाही.

२/- वरील अटींचा भंग झाल्याचे आपल्या निदर्शनास आल्यास शाळेविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी लागेल, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासु,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - ५ करिता

प्रत शिक्षणाधिकारी, जि.प. पुणे यांचकडे माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित-

Permission to open Std. VI. 85 I

Question No.

8/6/73

जा॰ क्र॰ माध्य-१ (३) पोडो 603
पुणे-१ दिनांक 29 MAY 1973

प्रति-

श्री॰ मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
~~न्यू इंग्लिश स्कूल~~
अन्जुमन हायस्कूल, जुन्नर
ता॰ जुन्नर जि॰ पुणे
संदर्भ:- आपला अर्ज क्रमांक .............. दिनांक ..........

महोदय,

आपल्या संदर्भीय केलेल्या अर्जानुसार तुमचे माध्यमिक शाळेत जून १९७३ पासून इयत्ता पाचवी, ६वी चे नवीन वर्ग उघडण्यासंबंधीचा प्रस्ताव विचारात घेऊन सदर माध्यमिक शाळेत इयत्ता ~~पाचवी~~/सहावी (प्रत्येकी एक तुकडी) मराठी माध्यमातून उघडण्याची अनुदान रहीत तत्वावर खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

अटी,

१) सदर शाळेत नवीन उघडावयाच्या वर्गाकरिता पुरेशा व योग्य इमारतीची सोय झालेली असावी.

२) नवीन वर्गाकरिता आवश्यक असलेल्या शैक्षणिक साहित्याची व फर्निचरची खरेदी करण्याची व्यवस्था झालेली असावी.

३) सदर वर्गाकरिता शासनाचे ठराव क्रमांक ओ॰ एस॰ ओ॰ ३८७०/८०८०/अ (२) दिनांक २७. ९. ७१ मधील परिच्छेद क्रमांक २ ते ४ मधील तरतुदीनुसार योग्य शिक्षक संच नेमण्याची व्यवस्था झालेली असावी.

४) नवीन वर्गात पुरेसे विद्यार्थी आवश्यक आहेत. कारण [illegible] माफी मिळणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. [illegible]

५) चालू वर्ग मंजूर (परिच्छेद १ मध्ये नमूद) केल्यापेक्षा जादा तुकड्या अगर वर्ग उघडण्याची परवानगी मात्र नाकारण्यात आलेली आहे. याची स्पष्ट नोंद घ्यावी. त्याकरिता कृपया निवेदन पाठवू नये.

कृपया तुम्ही त्वरित वरील अटींची पूर्तता केल्याचा अहवाल या कार्यालयास तसेच आपले जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिनांक २५-६-१९७३ पूर्वी पाठवावा अशी विनंती आहे.

आपला विश्वासू

कुलकर्णी/ २२. ५

शिक्षण उपसंचालक पुणे विभाग,
पुणे-१.

15/7/74

86

No. Edn/Sec/V-VII/74
Poona-11. Dated:-

IMMEDIATE

To

The Head Master/~~Supdt./Principal~~,
Anjuman High School, Junnar, Poona.

Sub:- Granting of the permission to attach Std. VII from June 1974.

Sir/Madam,

Under instructions from the Dy. Director of Education, P.R. Poona on the subject cited above, you are informed that the permission is granted to your School to open one division of Std. VII w.e.f. June 1974 subject to the fulfilment of the below mentioned conditions.

1. Arrangements regarding adequate accommodation.
2. Appointment of adequate qualified teaching Staff.
3. Adequate furniture, equipments etc. is made available.
4. Permission for shift system will not be granted, because of permission for attaching Std. V

It should please be noted that before such Std. is opened, it should be ensured that all the above conditions are fulfilled. If any Std. or division is opened by the School over and above Stds. mentioned above without prior approval of appropriate authority, the responsibility for the same will be of the School concerned which may please be noted.

Yours faithfully

Education Officer, Z.P.
Poona.

Copy to Shri S.G. Borkar E.O. (Edn), Panchayat Samiti Junnar, Tal. Junnar District Poona. He will visit the School immediately and see that the conditions mentioned above are fulfilled by the School, compliance report will be submitted to this office. He will further report whether parralel classes in Z.P. Primary Schools are closed down in consiquence of opening of above Stds. by Secondary Schools.

Copy to All the Dy. Education Officers, Z.P. Poona.
" " Dy. Education Inspectors, Z.P. Poona for similar action.

Immediate:-

No. S-48-(O.H.)-C,
Poona-1:- 19 APR [illegible]

87

To

The President,

Anjuman-i-Ittehad-o-Taraqqui

Taluka Junnar, Dist. Poona.

Sub:- Anjuman-i-Ittehad-o-Taraqqui, Junnar.
Permission to open new school
at the ________ during the year 1960-61

Sir,

Reference your letter No, Nil of 1960-61 dated 10-2-1960 ______ on the subject mentioned above.

2/-. In view of the circumstances reported by you permission is granted to open a Secondary school at Junnar ______ Taluka Junnar ______ Dist, Poona teaching Std. VIII ______ only through Urdu ~~Marathi~~ medium on the following conditions with effect from June 1960.

i) Adequate, suitable and well ventilated lighted accommodation is provided for the school. Similarly adequate sanitary arrangement are made.

ii) Adequate furniture, teaching aids, Science equipment and that for Physical Education drawing etc. is provided

iii) A sufficient play-ground is provided.

iv) Teachers' and Pupils' libraries are furnished with adequate No. of books to start with.

v) A trained graduate with at least five years' teaching experience is appointed as the Head Master and arrange--ments for the teaching of Science, Drawing, Hindi and Physical Education and other subjects are made by eappointing suitably qualified and trained teachers of these subjects.

vi) Fees are charged at the prescribed rates and if they are chargedat higher or lower rates, permission of the Department is obtained for the same.

vii) The Management undertakes to abide by the rules and regulations of the Department and to carry out the suggestions made by the Department from time to time.

viii) The management should make arrangement to build up an adequate Reserve Fund within a period of three years.

3/-. It should be noted that the question of recognition and grant to the school will be decided on merit when the school is actually started and inspected by the Department. The date of opening of the school and the arrangements actually made about accommodation, staff, furniture, library, the no. of pupils enrolled by standards etc. should be reported to this office immediately.

जा. क्र. उमाशि-१/पुवि/वर्गमान्यता/आदेश/९९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 16 FEB 2000

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
अंजुमन हायस्कूल जुन्नर
ता. जुन्नर जि. पुणे

विषय .- सन १९९९-2000 या शैक्षणिक वर्षी उच्च माध्यमिक इयत्ता ११वी चो [ प्रथम वर्षे] नविन/~~वाढा~~ /~~अतिरिक्त~~ ~~शाखा~~/वर्ग मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- १] शासन पत्र क्र. एच.एस.सी/१०९९/[२५४०]उमा.शि-५ दि. ५/७/९९
२] मा. शिक्षण यांचे प.क्र. एच.एस.सी/१०९९/९९-2000/४९२०५/ १२एच.एस दि. २/८/९९

वरिल विषयाबाबत संदर्भिय आदेशानुसार कळविण्यांत येते की, सन १९९९-2000 या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११वी चो [ प्रथम वर्षे] खालोल नवीन/~~वाढा~~ ~~अतिरिक्त~~ ~~शाखा~~ वर्गांना विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

| इयत्ता | शाखा | | | | एकूण तुकड्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| इ. ११वी प्रथम वर्ष | १ (प्रथम) सहशिक्षण | — | — | — | १ (प्रथम) | विना अनुदान तत्वावर मंजूर |
| इ. १२ वी द्वितीय वर्षे | — | — | — | — | — | — |
| एकूण:- | १ (प्रथम) | — | — | — | १ (प्रथम) | सहशिक्षण उर्दू |

अटी:-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे आहे. तसेच ज्या माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाच्या वर्गाला परवानगी द्यावयाची आहे अशी माध्यमिक शाळा मान्यताप्राप्त आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यांत घेण्याबाबत xx एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

५] ही परवानगी शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एचएससी /१०४६/४१९/ २०२१ /दिनांक ६.५.७६ व त्यानंतर वेळोवेळी विहित केलेल्या अटींच्या पूर्ततेवर म्हणजेच सरासरी हजेरी, शाळा गृहांच्या खोल्या व इतर भौतिक सुविधा, शैक्षणिक पात्रता धारण करणारे प्रशिक्षित शिक्षक, शैक्षणिक साहित्य, विज्ञान साहित्यासह प्रयोगशाळा इ. ची पूर्तता करण्याच्या अटींवर xxxx परवानगी देण्यांत येत आहे. वर्ग सुरू केला असल्यास पटसंख्या व सरासरी हजेरी कळवावी. व सदर विना अनुदानीत वर्गासाठी नियुक्ती केलेल्या शिक्षकांची मान्यता त्वरीत घ्यावी.

६] प्रथमच नवीन वर्ग उघडण्यांत आलेल्या संस्थेत/क.म.वि. स. शासन निर्धारित विहित शुल्क रु.५०००/- भरण्याच्या अटींवर परवानगी देण्यांत येत आहे. सदरचे शुल्क भरले नसल्यास ते त्वरित भरावे त्या चलनाची सत्य प्रत या कार्यालयास सादरकरावी.

७] स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयांस परवानगी देता येणार नाही. अनधिकृतपणे स्वतंत्ररित्या इ. ११ वी /१२ वी चे वर्ग सुरु असल्यास ते त्वरित बंद करावेत.

८] चालू शैक्षणिक वर्षी वर्ग सुरू केलेला नसल्यास या मान्यता पत्राच्या आधारे पुढील वर्षी वर्ग सुरू करता येणार नाही. त्यासाठी पुनश्च: शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचे मार्फत नुतनीकरणाचा प्रस्ताव पाठवावा.

९] या मान्य झालेल्या वर्गात सध्या किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. तसेच वर्ग सुरु आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल प्राचार्यांनी/ मुख्याध्यापकांनी या कार्यालयास आठ दिवसांत सादर करावा.

~~१०] पुढील शैक्षणिक वर्षी इ. १२ वी चा नैसर्गिक वाढीचा वर्ग सुरु करावयाचा असल्यास~~ शिक्षण अधिकारी [माध्यमिक] यांच्या मार्फतच प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावा. शासनाच्या परवानगी शिवाय वर्ग सुरु ठेवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यांवर / मुख्याध्यापकांवर राहील याची नोंद घ्यावी.

स्थळप्रतीवर मा. शिक्षण उपसंचालक यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१
करिता

प्रत:-

१] मा. शिक्षण सचिव,
शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-३२ यांना सविनय सादर.

२] मा. शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संदर्भिय पत्रानुसार माहितीसाठी सविनय सादर.

३] शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/रायगड /सोलापूर यांना
योग्य त्या माहितीसाठी व [illegible]

(1)

Deshmukh 5/9/2000

20854

जा.क्र. उमा. शि-१/पुवि/वर्ग
मान्यता-आदेश २०००/२००१
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय-
दि. / /२००० 28 AUG 2000

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,

अंजुमन इस्लाम उर्दू हायस्कूल जुन्नर, पुणे.

विषय :- सन २०००/२००१ या शैक्षणिक वर्षी उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी द्वितीय वर्ष नवीन जादा/अतिरिक्त शाखा/वर्ग मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक यांचे ज. क्र. ——————

वरील विषयाबाबत संदर्भ आदेशानुसार कळविण्यात येते की, सन २०००/२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १२ वी [द्वितीय वर्ष] खालील नवीन/जादा/अतिरिक्त शाखा वर्गांना विनाअनुदान तत्वावर खालील अटींच्या आधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| इयत्ता | शाखा | | | | एकूण तुकडया | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| इ. ११वी प्रथम वर्ष | — | — | — | — | — | — |
| इयत्ता १२ वी द्वितीय वर्ष | १ प्रथम | — | — | — | १ प्रथम | विना अनुदान तत्ववर मान्यता |
| एकूण | १ प्रथम | — | — | — | १ प्रथम | —"— |

अटी –

१] संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे आहे. तसेच ज्या माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाच्या वर्गाला परवानगी द्यावयाची आहे अशी माध्यमिक शाळा मान्यताप्राप्त आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकाराचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात

५] ही परवानगी शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एचएससी/१०४६ /४१९/२०२१/दिनांक ६/५/७६ व त्यानंतर वेळोवळी विहीत केलेल्या अटींच्या पूर्ततेवर म्हणजेच सरासरी हजेरी , शाळागृहांच्या खोल्या व इतर भौतीक सुविधा, शैक्षणिक पात्रता धारण करणारे प्रशिक्षित शिक्षक शैक्षणिक साहित्य, विज्ञान साहित्य, प्रयोगशाळा इत्यादिंची पूर्तता करण्याच्या अटींवर परवानगी देण्यात येत आहे. <u>वर्ग सुरु केला असल्यास पटसंख्या व सरासरी हजेरी कळवावी.</u>

६] प्रथमच नवीन वर्ग उघडण्यात आलेल्या संस्थेस/कमविस शासन निर्धारित विहित शुल्क रू. ५०००/- भरण्याच्या अटींवर परवानगी देण्यात येत आहे. सदरचे शुल्क भरले नसल्यास ते त्वरीत भरावे. त्या चलनाची सत्य प्रत या कार्यालयात सादर करावी.

७] स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयास परवानगी देण्यात येणार नाही. अनधिकृतपणे स्वतंत्ररित्या इयत्ता ११ वी/१२ वी चे वर्ग सुरु असल्यास ते त्वरीत बंद करावेत.

८] चालू शैक्षणिक वर्षी वर्ग सुरु केलेला नसल्यास या मान्यता पत्राच्या आधारे पुढील वर्षी वर्ग सुरु करता येणार नाही. त्यासाठी पुनःश्च शिक्षणाधिकारी [माध्य.] यांचेमार्फत नुतनीकरणाचा प्रस्ताव पाठवावा.

९] या मान्य झालेल्या वर्गात सध्या किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे तसेच वर्ग सुरु आहे किंवा नाही. याबाबतचा अहवाल प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी या कार्यालयास ८ दिवसात सादर करावा.

१०] पुढील शैक्षणिक वर्षी इयत्ता १२ वी च्या नैसर्गिक वाढीचा वर्ग सुरु करावयाचा असल्यास शिक्षणाधिकारी [माध्य. ] यांच्या मार्फत प्राचार्यांनी / मुख्याध्यापकांनी विहीत मुदतीत प्रस्ताव सादर करावा. शासनाच्या परवानगी शिवाय वर्ग सुरु ठेवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यांवर/मुख्याध्यापकांवर राहील. याची नोंदी घ्यावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ यांचे
करिता.

स्थळप्रतिवर मा. शि.उ.सं.
यांची सही असे.

प्रत:- १] मा. शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे
यांना संदर्भिय पत्रानुसार माहितीसाठी सविनय सादर.

२] शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/रायगड/सोलापूर यांना
योग्य त्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.